महाराष्ट्र शासन

**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**

**जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकिय सदस्यांची नियुक्ती**

**जाहिरात सुचना**

क्र.९/जिपुअ/क.लि./ग्रासंक/कावि32/२०२१ . जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, नागपूर दिनांक :-१६/2/२०२१

ग्राहक संरक्षण अधिनियम,१९८६ च्या कलम ७ व ८ नुसार ग्राहकांच्या अधिकारांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद स्थापन करण्यासाठी खालील प्रमाणे अशासकिय सदस्यांची संख्या व प्रवर्ग निश्चित करुन नेमणुक करण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात येत असून शासन निर्णय, क्र.ग्रासंप १०१३/प्र.क्र.११९/ग्रासं-२,दिनांक १९.१०.२०१३ मध्ये पात्रतेचे निकष देण्यात आलेले आहेत. तसेच सदरची जाहिरात व शासन निर्णय दिनांक १९.१०.२०१३ nagpur.nic.in संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात येईल. तसेच शासन निर्णय दिनांक १९.१०.२०१३ हा महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून सांकेतांक क्रमांक २०१३१०१९१६०२५२६३०६ असा आहे.

खालील प्रवर्गातील प्रतिनिधींनी आपले अर्ज जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय पुरवठा शाखा, नागपुर येथे (कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून) शासनाने विहीत केलेल्या परिशिष्ट अ व ब प्रमाणे परिपूर्णपणे भरुन साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक राहील. साक्षांकन हे केंद्र/राज्य शासनाच्या राजपत्रित अधिकारी यांचे असावे. साक्षांकित प्रती जोडल्या नसल्यास सदरचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.शासन निर्णय दिनांक १९.१०.२०१३ मधील निकषांची पुर्तता करणे आवश्यक राहील. उक्त निवडीचे निकष पुर्ण न करणा-या अर्जदारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

| **अ.क्र.** | **जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्त करावयाच्या अशासकिय सदस्याचा प्रवर्ग** | **नियुक्त करावयाच्या प्रतिनिधींची संख्या** |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **प्रवर्ग** | **रिक्त जागा** |
| १. | महानगर पालिका/नगरपरिषदांचे सदस्य | २ |
| २. | पंचायत समिती सदस्य | १ |
| ३. | कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य | २ |
| ४ | वैद्यक व्यवसायाचे प्रतिनिधी | २ (एक महिला व एक पुरुष सदस्य) |
| ५. | गॅस विक्रेत्यांचे प्रतिनिधी | १ |
| ६. | ग्राहक संघटनेचे प्रतिनिधी | १ |

जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या नंतर व अपूर्ण असणारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. एकूण अशासकिय सदस्यांच्या संख्येच्या किमान २०% टक्के महिलांना प्रतिनिधित्व राहिल.

(रविंद्र ठाकरे)
जिल्हाधिकारी,
नागपूर.